रत्नागिरी मंडणगड



Gmail

DCF Mangrove Cell <dcfmangrovecell@gmail.com>

## w: kandalvan takrar mhapral tal mandangad dist rtn ahval

1 message

**Revenue Collector** <revenuecollector@yahoo.in> Wed, Jan 31, 2024 at 5:21 PM
To: DCF Mangrove Cell <dcfmangrovecell@gmail.com>

दय / महोदया,

कृपया सोबत जोडलेली फाईल डाऊनलोड करुन पहा.

**E-mail- ratnagirirb@gmail.com ,revenuecollector@yahoo.in**
**Phone No.** 02352-224222
*कागद बनविणेसाठी वृक्षतोड केली जाते. झाडे लावा, झाडे वाचवा.*
*या अगदी जरुरी असेल, तरच प्रिंट काढावी .*

(तेजस्विनी पाटील )
तहसीलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 361
दिनांक 31.01.2024
प्रशासकीय अधिकारी — उप वनसंरक्षक
Mangrove Comm

Forwarded message -----
**From:** Revenue Collector <revenuecollector@yahoo.in>
**To:** dir1.mev-mh@nic.in <dir1.mev-mh@nic.in>; R Konkan <rbkonkan@gmail.com>; Rbkonkan <rbkonkan@rediffmail.com>
**Sent:** Monday, 29 January, 2024 at 01:52:41 pm IST
**Subject:** kandalvan takrar mhapral tal mandangad dist rtn ahval


दय / महोदया,

कृपया सोबत जोडलेली फाईल डाऊनलोड करुन पहा.

**E-mail- ratnagirirb@gmail.com ,revenuecollector@yahoo.in**
**Phone No.** 02352-224222
*कागद बनविणेसाठी वृक्षतोड केली जाते. झाडे लावा, झाडे वाचवा.*
*या अगदी जरुरी असेल, तरच प्रिंट काढावी .*

(तेजस्विनी पाटील )
तहसीलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी


Forwarded message -----
**From:** nandini pilankar <nandinipilankar10@gmail.com>
**To:** "revenuecollector@yahoo.in" <revenuecollector@yahoo.in>
**Sent:** Monday, 29 January, 2024 at 01:41:28 pm IST
**Subject:** DocScanner 19-Jan-2024 12-50 pm.pdf

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र.201, महसूल शाखा, जयस्तंभ ता.जि.रत्नागिरी
दुरध्वनी क्र:- 02352-222483 फॅक्स क्र. 02352-226250
02352-224222 Email ID :- revenuecollector@yahoo.in

क्र.महसूल/अेके-१/कांदळवन तक्रार/म्हाप्रळ मंडणगड/2023 दिनांक :- 29/01/2024

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष मुंबई, 302, बेक फिल्ड हाऊस, 3 रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट मुंबई 400 00

विषय :- अनधिकृतपणे मोठया प्रमाणावर कांदळवनाची कत्तल करुन व खाडी पात्रात भराव करुन पर्यावरणाचा —हास करणा-या वाळू माफीयांच्यावर कडक कार्यवाही होणेबाबत.
श्री.बापू सावळाराम जगधने, उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांचा दिनांक 13-10-2023 रोजीचा तक्रार अर्ज

संदर्भ :- 1. आपले कार्यालयाकडील पत्र. जा.क्र/ल.ले/कां.स/359/सन 2023-24 दिनांक 17-01-2024
2. मा.अवर सचिव, पर्यावरण विभाग यांचेकडील पत्र क्र.2023/प्र.क्र.99/टीसी-4 दिनांक 12-09-2023
3) उपविभागीय अधिकारी दापोली यांचेकडील पत्र क्रमांक/जवाबी/कांदळवन कत्तल/01/2024 दिनांक 18/01/2024

विषयांकित कांदळवन -हासाबाबतची तक्रार संदर्भिय पत्रान्वये आपले कार्यालयाकडून पाठविण्यात आली असून प्रकरणी अर्जदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ नियमोचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल, पंचनामा, संबंधीत जागेचे Geo tagged छायाचित्रांसहित पुढील बैठकीपूर्वी समितीस उपलब्ध करुन देण्याबाबत कळविणेत आले आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी करुन उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 18/01/2024 चे पत्रान्वये अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. त्यांचे अहवालानुसार, उपविभागीय अधिकारी दापोली स्वत:, तहसीलदार मंडणगड, वनपरिक्षेत्र अधिकारी दापोली, वनपाल मंडणगड, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे भूकरमापक, मंडळ अधिकारी म्हाप्रळ, तलाठी म्हाप्रळ व तक्रारदार स्वत: यांचे समक्ष दिनांक 18/01/2024 रोजी स्थळपाहणी केली असता, मौजे म्हाप्रळ ता.मंडणगड येथील स.नं.83/4 मध्ये कांदळवन वनस्पती सुस्थितीत असून कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही. स.नं.85/3 ची पहाणी केली असता त्यामध्ये सिमाब मुकादम यांचे मालकीची इमारत असून

त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवन वनस्पती नाही. स.नं.85/2 ची पहाणी केली असता त्यामध्ये कांदळवन वनस्पती असून काही भाग पाणथळ आहे. त्यामध्येही वृक्षतोड अथवा भराव केल्याचे दिसून येत नाही. स.नं.86/1 व 88/19 याची पहाणी करता त्यामध्ये जंगली झाडे व झुडपे असून कांदळवन वनस्पती दिसून येत नाही. त्यानंतर खाडी पात्रापासून साधारण 3 कि.मी.अंतरावर स.नं.36/16 व 36/27 याची पाहणी करता क्षेत्रामध्ये जंगली वनस्पती व झुडपे असल्याची खात्री होत आहे. वरीलप्रमाणे तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने नमूद स.नं. यांची खात्री करता त्यामध्ये कोणतीही कांदळवन वनस्पती तोडल्याचे अथवा भराव केल्याचे दिसून आलेले नाही.

तक्रारीच्या अर्जाच्या अनुषंगाने अर्जात नमूद नसलेल्या खाडीपात्रालगत असलेल्या मालकी स.नं.83/1, 83/2 व 83/3 याची सुध्दा खात्री केली असता स.नं.83/3 मध्ये जुनी इमारत असून ती 1993 सालामध्ये बांधलेली असून त्याबाबत ग्रामपंचायत म्हाप्रळ यांनी दिलेल्या घरबांधणी परवानगीची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. लगतचे स.नं.83 व हि.नं.1,2 यांची तपासणी करता त्यामध्ये मोकळी जागा व काही कातळ भाग दिसून आलेला आहे. सद्यस्थितीला सदर क्षेत्रात नव्याने कोठेही कांदळवन वनस्पती तोडल्याचे किंवा भराव केल्याचे दिसून आलेले नाही.

सदर संपूर्ण स.नं. क्षेत्राचे सन 1985, 2012 ते 2023 पर्यतचे गुगल अर्थ प्रो या वेब ॲप्लीकेशनदवारे छायाचित्रणाची पाहणी केली असता सदर स.नं. चे नकाशे उपलब्ध असून 1985 चा नकाशा हा अस्पष्ट दिसून येत आहे व सन 2012 ते 2023 पर्यंतच्या नकाशांची पाहणी केली असता ते स्पष्टपणे दिसत असून सदर नकाशामध्ये जागेवर कोणत्याही प्रकारचे कांदळवन आढळून येत नाही. त्यामुळे सन 2012 पूर्वी सदर जागेवर कांदळवन होते अगर कसे हे निश्चीत सांगता येत नाही. सोबत गुगल अर्थ प्रो या वेब ॲप्लीकेशनदवारे काढलेले नकाशे, स्थळपहाणी अहवाल व प्रत्यक्ष जागेवरील काढलेले वेब कॅम नकाशे जोडण्यात आले आहेत.

तरी उपविभागीय अधिकारी दापोली यांचे अहवालानुसार मौजे म्हाप्रळ ता.मंडणगड जि.रत्नागिरी येथील तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने नमूद स.नं. यांची खात्री करता सद्यस्थितीला सदर क्षेत्रात नव्याने कोठेही कांदळवन वनस्पती तोडल्याचे किंवा भराव केल्याचे दिसून आलेले नाही. सोबत पृष्ठ क्र.1 ते 55 आहेत.

*स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची..*

(signature)
(चंद्रकांत सूर्यवंशी)
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**

प्रत:-अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, 15 वा मजला,नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड मंत्रालय, मुंबई 400 032.